# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः01.08.2024** **वारःगुरुवार**

---

1. अर्थसंकल्पात प्राधान्यक्षेत्रांमध्ये योग्य संतुलन राखल्याचं केंद्रिय अर्थमंत्र्यांचं स्पष्टीकरण
2. राज्याचे नवनियुक्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी पदभार स्विकारला
3. मराठवाड्यातल्या सिंचन योजनांसाठी निधीची कमतरता नाही-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आश्वासन आणि
4. पूजा खेडकरची प्रशिक्षणार्थी उमेदवारी रद्द, भविष्यात यूपीएससीची कुठलीही परीक्षा देण्यास कायमस्वरुपी अपात्र

**अर्थमंत्री राज्यसभा**

अर्थसंकल्पात विकास, रोजगार, कल्याणकारी योजना, भांडवली गुंतवणूक आणि आर्थिक स्थैर्य यासारख्या प्राधान्याच्या क्षेत्रांमध्ये योग्य संतुलन राखण्यात आलं आहे असं केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल राज्यसभेत स्पष्ट केलं. अर्थसंकल्पाद्वारे सहकारी संघराज्य पद्धतीला पाठबळ दिल्याचं सांगून कृषीक्षेत्राचा निधी कमी केल्याचा विरोधकांचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. शिक्षण, रोजगार आणि कौशल्य विकासासाठी 1 लाख 48 हजार कोटी रुपयांचा निधी राखून ठेवल्याची माहिती त्यांनी दिली. विविध उपाययोजनांमुळे करसंकलनात वाढ झाली आहे. वित्तीय तूट कमी करण्याचं सरकारचं उद्दीष्ट असून त्यादृष्टीनं वाटचाल सुरू आहे. अग्नीवीर योजनेचा भारतीय सैन्याला फायदाच होणार आहे. त्यावर राजकारण करण्याची गरज नाही असं सीतारामन म्हणाल्या.

**गृहमंत्री वायनाड**

केरळ राज्य सरकारला अतीवृष्टी आणि दरड कोसळण्याबाबत चार वेळा पूर्वइशारा दिला होता असं केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी काल राज्यसभेत सांगितलं. एनडीआरएफ ची 9 पथकंही राज्यात पाठवण्यात आली. मात्र राज्य सरकारनं तिथल्या नागरिकांना वेळेत सुरक्षित स्थळी हलवलं नाही. एनडीआरएफ ची पथकं राज्यात दाखल झाल्यावर केरळ सरकारनं सतर्क होऊन नागरिकांना हलवलं असतं तर नुकसान कमी करता आलं असतं असं अमित शहा म्हणाले. भारतात नैसर्गिक आपत्तींचा किमान सात दिवस आधी इशारा देऊ शकणारी यंत्रणा कार्यान्वित असून ओडिशा, गुजरातसह इतर राज्यांनी याचा वापर करुन नुकसान कमी करण्याचे प्रयत्न केले अशी माहिती त्यांनी दिली. दरम्यान, केंद्र शासन वायनाड दुर्घटनेचा सामना करण्यासाठी केरळ सरकार आणि तिथल्या लोकांच्या पाठिशी भक्कमपणे उभं असल्याचं आश्वासन शहा यांनी दिलं.

**राज्यपाल शपथविधी**

राज्याचे नवनियुक्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल राज्यपाल पदाची शपथ घेतली. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी राज्यपालांना शपथ दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, मंत्रिमंडळ सदस्य आणि वरीष्ठ

प्रशासकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते. शपथ सोहळ्यानंतर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना शुभेच्छा दिल्या.

**<u>मराठवाडा सिंचन प्रकल्प</u>**

मराठवाड्यातल्या सिंचनासाठी पाणी देण्यास राज्य शासनानं प्राधान्य दिलं असून मराठवाड्यातल्या सिंचन योजनांसाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिलं. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. सिंचन प्रकल्पांसाठीच्या दृष्टीनं आवश्यक मान्यता आणि प्रशासकीय बाबी तातडीनं पूर्ण कराव्यात, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या. मराठवाड्याला पाणी देण्याबाबत उच्च न्यायालयाने निर्देश दिले होते त्यानुसार पाणी दिलं जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>टोयोटा प्रकल्प</u>**

छत्रपती संभाजीनगरमधल्या टोयोटा किर्लोस्कर प्रकल्पामुळे मराठवाड्याला मोठा फायदा तर होईलच शिवाय एकूणच भारतातील मोटार वाहन निर्मिती उद्योगातदेखील एक क्रांती येईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काल म्हणाले. राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि टोयोटा किर्लोस्कर यांच्यात इलेक्ट्रिक आणि हायब्रीड मोटार निर्मितीच्या ग्रीनफिल्ड प्रकल्पासाठी सामंजस्य करार करण्यात आला त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत तसंच अन्य मान्यवर उपस्थित होते. या प्रकल्पामुळे देशाच्या इलेक्ट्रिक मोटार निर्मिती उद्योगात क्रांती येईल असं सांगून राज्य शासनदेखील अशा वाहनांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. हा करार ऐतिहासिक असल्याचं म्हणत मराठवाड्यातील  चेंबर ऑफ कॉमर्स समूह या उद्योगासाठी शासनाच्यावतीनं सर्वतोपरी सहकार्य करेल असं आश्वासन फडणवीस यांनी यावेळी दिलं.

**<u>विदेशी महिला-सिंधुदुर्ग</u>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात जंगलात आढळलेल्या विदेशी महिलेला स्थानिक नागरिकांनी मदत करुन प्राणसंकटातून वाचवलं. कोकणातल्या माणुसकीचं दर्शन घडवणाऱ्या या घटनेचा हा वृत्तांत...

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या शनिवारी सावंतवाडी तालुक्यात रोणापाल इथल्या जंगलात एक विदेशी महिला झाडाला साखळदंडाने बांधलेल्या अवस्थेत आढळली होती. त्या महिलेच्या ओरडण्याचा आवाजामुळे एका गुराख्यान तिला पाहिल्यावर त्यानं याची माहिती गावात जाऊन दिली. मग पोलिसांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीनं लाकडाची डोली करून जंगलातून सुमारे तीन किलोमीटर अंतरावरून तिला मुख्य रस्त्यावर आणलं. मूळ अमेरिकेची ती 49 वर्षीय महिला असून ललिताकायी कुमार एस असं तीच नाव आहे. तिच्या नवऱ्याने तिला त्या जंगलात आणून साखळीने बांधल्याचं तिने पोलिसांना सांगितलं. दोन ते तीन दिवस ती भर पावसात त्या घनदाट जंगलात होती. त्यामुळे तिला खूप अशक्तपणा आला होता. तिला तातडीनं सावंतवाडीच्या उप जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यावेळी सावंतवाडीच्या सामाजिक बांधिलकी या संस्थेच्या माणुसकीच दर्शन झालं. त्या महिलेला अंघोळ घालणं तिचे कपडे बदलणं गरजेचं होत. त्यामुळे पोलिसांनी या संस्थेच्या महिला कार्यकर्त्यांना विनंती केली. त्यांनी देखील अजिबात वेळ न दवडता रुग्णलायत धाव घेतली. त्या महिलेला अंघोळ घालून तिचे कपडे बदलल्यांनंतर त्या महिलेला थोडी तरतरी आली. नन्तर तिला जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आलं आणि तिथून अधिक उपचारासाठी तिला आता गोवा मेडिकल कॉलेज यामध्ये हलवण्यात आलं आहे. तिथे तिच्यावर उपचार सुरु आहेत. पोलीस आपलं तपासच काम करत आहेत. तिच्या नवऱ्यावर बांदा पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. तपास होईल. सत्य बाहेर येईल पण एक विदेशी महिला प्राणसंकटात असताना**

**तिच्यासाठी सिंधुदुर्गवासीयांनी दाखवलेली माणुसकी मात्र खुप महत्वाची ठरली आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, निलेश जोशी, सिंधुदुर्ग.**

**<u>विद्यार्थी सत्कार</u>**

सौदी अरेबियात झालेल्या 56 व्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिम्पियाडमधल्या पदक विजेत्या भारतीय विद्यार्थ्यांचा काल मुंबईत सत्कार करण्यात आला. रियाध इथं 21 ते 30 जुलै दरम्यान झालेल्या या स्पर्धेत जळगावच्या देवेश पंकज भैया यानं सुवर्ण पदक, मुंबईच्या अवनीश बन्सल आणि हैदराबादच्या हर्षिन पोसीना यांनी रौप्य पदक तर मुंबईच्या कश्यप खंडेलवालनं कास्य पटकावलं.

**<u>पूजा खेडकर</u>**

केंद्रिय लोकसेवा आयोगानं पूजा खेडकर हिच्याविरोधात कारणं दाखवा नोटीस जारी केली असून तिची प्रशिक्षणार्थी उमेदवारीही रद्द केली आहे. तसंच भविष्यात कुठलीही परीक्षा देण्यास कायमस्वरुपी अपात्र ठरवलं आहे. आयोगाकडे असलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर पूजा खेडकरनं नागरी सेवा परीक्षा नियमांचं उल्लंघन केल्याचं आढळून आल्याची माहिती आयोगानं पत्रकाद्वारे दिली आहे.

बनावट ओळखपत्रं सादर करुन फसवणूक केल्याप्रकरणी आयोगानं याआधीही पूजा खेडकरला कारणे दाखवा नोटीस पाठवली होती. यूपीएससीची परीक्षा निर्धारित संख्येपेक्षा जास्त वेळा दिल्याबद्दल दोषी ठरवून ही कारणं दाखवा नोटीस पाठवली होती मात्र मुदत संपल्यानंतरही खेडकरनं त्याचं स्पष्टीकरण सादर केलं नाही असं आयोगानं म्हटलं आहे. अशा प्रकारची घटना पुन्हा घडू नये म्हणून यूपीएससी आपली प्रमाणित कार्यपद्धती आणखी निर्दोष बनवेल असं या पत्रकात नमूद करण्यात आलं आहे.

**<u>कार्यशाळा-रत्नागिरी</u>**

रत्नागिरी जिल्हा उद्योग केंद्रातर्फे काल रत्नागिरीत इग्नाइट महाराष्ट्र या कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रासाठीची राज्य आणि केंद्र सरकारची धोरणं आणि उपक्रम याबाबत उद्योजकांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी ही कार्यशाळा घेण्यात आली. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीतून गावागावात एकत्रितपणे कारखाने उभारता येतील का, या दृष्टीनं विचार करून सर्वांनी प्रयत्न करावे, असं आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तिकिरण पुजार यांनी या कार्यशाळेत केलं.

**<u>उरणशिक्षा-नवीमुंबई</u>**

उरण हत्याकांडातील आरोपी दाउद शेख याला पनवेल सत्र न्यायालयानं सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यशश्रीनं लग्न करुन कर्नाटकात येण्यास नकार दिल्यानं तिची हत्या केल्याची कबुली दाउदनं दिली आहे. याप्रकरणी उरण पोलीस अधिक तपास करत आहेत.

**<u>निवृत्त</u>**

आकाशवाणी पुणे केंद्रातील सहाय्यक अभियंता शरद देसाई 36 वर्षांच्या सेवेनंतर काल सेवानिवृत्त झाले. त्यांनी विविध केंद्रांवर अभियांत्रिकी विभागात काम केलं. केंद्राच्या वतीनं त्यांना काल निरोप देण्यात आला.

**नेमबाजी ऑलिम्पिक**

महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्निल कुसळे यानं पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत 50 मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात अंतिम फेरीत धडक मारली आहे. स्वप्नीलनं या प्रकारातील जगातील सर्वोत्तम आठ नेमबाजांमध्ये स्थान मिळवलं आहे. भारतीय वेळेनुसार आज दुपारी 1 वाजता स्वप्निल नेम साधणार आहे.

**खाशाबा-मोहोळ**

'स्वतंत्र भारतासाठी पहिलं ऑलिम्पिक पदक जिंकून देणारे पैलवान दिवंगत खाशाबा जाधव यांना पद्म पुरस्कारानं सन्मानित करण्यात यावं, यासाठी केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांची केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल भेट घेतली. खाशाबा जाधव यांनी कुस्तीसाठी दिलेलं योगदान तसंच महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेबद्दलची माहिती मोहोळ यांनी मांडविय यांना दिली.

**हवामान**

राज्यात सर्वत्र पावसाची शक्यता असून कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**पाणी विसर्ग-अहमदनगर**

अहमदनगर जिल्ह्यातलं भंडारदरा धरण 90 टक्के भरलं असून धरणाच्या सांडव्यातून प्रवरा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे भंडारदरा धरण ते निळवंडे जलाशयापर्यंतच्या नदीकाठच्या नागरीकांनी सतर्क राहावं असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.